विधानमंडळाच्या समित्या, समितीसमोर उपस्थिती, समितीस पुरवावयाची माहिती व समित्यांच्या शिफारशींवरील कार्यवाही करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक,क्रमांक : बीसीसी-२००१/१७६४/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २८ जानेवारी,२००२.

संदर्भ : शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक : संकीर्ण-१०९०/२,
दिनांक ३० जुलै,१९९० आणि दिनांक ७ सप्टेंबर,१९९०.

शासन परिपत्रक :

महाराष्ट्र विधानसभा व विधान परिषद नियमांनुसार विधानमंडळाच्या विविध समित्या नियुक्त केलेल्या असून, या समित्यांना, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांकः संकीर्ण-१०९०/२/१६-ब, दिनांक ३० जुलै,१९९० आणि दिनांक ७ सप्टेंबर,१९९० नुसार समितीसमोर उपस्थितीत रहाणे, माहिती उपलब्ध करुन देणे या संदर्भातील निदेश देण्यात आलेले आहेत, परंतू या निदेशाचे पालन केले जात नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असून यासंदर्भात पुन्हा याव्दारे निदेश देण्यात येत आहेत.

२. शासनाच्या कामकाजाच्या ज्या विशिष्ट बाबी संबंधित तज्ञांकडून मार्गदर्शन किंवा तपशीलवार माहिती, विचारविमर्श आवश्यक असतो अशा बाबींवर कार्यवाही करण्यास सहाय्य व्हावे, यासाठी महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषद नियमांनुसार विधानमंडळाच्या विविध समित्या नियुक्त केल्या जातात. मागासवर्गीयांच्या संदर्भात अनुसूचित जाती कल्याण समिती, अनुसूचित जमाती कल्याण समिती व विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती अशा ३ समित्या आहेत. या समित्या महत्वाच्या आहेत. या समित्यांचे कामकाज विधानसभा/परिषद नियमांनुसार चालत असते. उदा.अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या कल्याणासाठी असलेल्या समित्या भारताच्या संविधानातील तरतुदींनुसार अनुसूचित जाती व जमातींच्या आयुक्तांनी सादर केलेल्या अहवालावर, अनुसूचित जाती व जमातीं संबंधित बाबींपैकी राज्य शासनाच्या कक्षेत येणा-या बाबींसंबंधात राज्य शासनाने काय उपाययोजना करावी याविषयी शिफारशी करतात. तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासाठी असलेली समिती, राज्य शासनाने आपल्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये व पदावर अशा जाती व जमातींच्या उमेदवारांना योग्य प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळाले आहे किंवा नाही याबाबत छाननी करुन त्या संदर्भात उचित अशा शिफारशी करतात. या समित्यांचेअहवाल विधानमंडळास सादर केले जातात आणि अशा अहवालातील शिफारशींवर शासनातर्फे उचित आणि त्वरित कारवाई अपेक्षित असते. ज्यावेळी या समित्यांच्या बैठकी बोलाविण्यात येतात त्यावेळी दिसून येते की,त्या समित्यांना माहिती वेळेवर मिळत नाही. जी माहिती मिळते ती अपूर्ण स्वरुपाची असते व समितीसमोर असलेले संबंधित अधिकारी योग्य माहिती त्यांना देत नाहीत. समित्यांनी केलेल्या शिफारशींवर शासनातर्फे तातडीने निर्णय घेतले जात नाहीत व निर्णय घेतले असल्यास त्याची माहिती समितीस पाठविली जात नाही. त्यामुळे या समित्यांना संपूर्ण सहकार्य देणे ही मंत्रालयीन विभागांची जबाबदारी आहे. म्हणून त्यांनी

समितीचे काम सुरळीत व नियमांनुसार चालावे याकरिता समित्यांना पुरवावयाची माहिती परिपूर्ण आणि त्वरेने उपलब्ध करुन द्यावी. तसेच या समित्यांनी केलेल्या विविध शिफारशींवर उचित अशी कार्यवाही विनाविलंब करुन त्याबाबतची माहिती त्यांना पुरविली जाईल याबाबत दक्ष असणे आवश्यक आहे.

उपरोक्त समित्यांच्या कामकाजास सर्वोच्च प्राथम्य द्यावे. अगदी अपवादात्मक परिस्थितीत विधानमंडळ सचिवालयाशी संपर्क साधून त्यांच्या पूर्वअनुमतीनेच या समित्यांच्या बैठकीच्या वेळेत, तारखेत बदल, अनुपस्थित राहण्यास परवानगी इत्यादीबाबत निर्णय घ्यावेत. परंतु, कुठल्याही परिस्थितीत प्रशासकीय कारणास्तव या बैठकींना गैरहजर राहणे/बैठकी पुढे ढकलण्याची विनंती करणे या बाबी कटाक्षाने टाळण्यात याव्यात. या सूचना सर्व मंत्रालयीन विभागांना पुनश्च देण्यात येत असून, विभागांनी या सूचना त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय/निमशासकीय कार्यालये/ महामंडळे/ स्वायत्त संस्था/ सहकारी संस्था इत्यादी कार्यालयाच्या निदर्शनास आणाव्यात.

ज.स.घाणेकर
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी ,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
अध्यक्ष, सर्व जिल्हा निवड समिती कार्यालये,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
संचालक, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प,
सर्व जिल्हा सेवायोजन अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/
कार्यालय/महामंडळे/विद्यापिठे/सहकारी संस्था इ.
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.
<u>प्रमुख</u>
* पत्राने


H-1209 (5000-03-02) 19.